**सहायक महसूल अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत (दिव्यांग प्रवर्ग) (नागपूर विभाग)..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.१५३/आस्था-९**
**(E-1344597)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ जानेवारी, २०२६

**वाचा :-**

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.मशा ६(३)/आस्था-१/सीआर-२८/२०२४, दि.२६.०३.२०२५ व दि.२९.०४.२०२५

२) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.मशा ६ (३) / आस्था-१ / सीआर-३२ / २०२५, दि.१२.०९.२०२५

**शासन आदेश:-**

नागपूर विभागातील सहायक महसूल अधिकारी संवर्गातील (**दिव्यांग प्रवर्ग**) खालील तक्त्यात नमूद कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार (गट -ब, राजपत्रित) या संवर्गात सन २०२३-२४ या निवडसूची वर्षात सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या सहमतीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे नियमित पदोन्नती कोट्यातील पदांवर खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, त्यांची नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना खालील तक्त्यातील स्तंभ क्र.५ येथे नमूद पदावर परिच्छेद क्र.२ येथील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

**अ) नियमित पदोन्नती :**

| अ. क्र. | दिव्यांग ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | पात्रता | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स.म.अ. मुळ ज्येष्ठता सूची २०२४ ज्ये.क्र. ३३३ | श्री.राजेश भोंगडे (दिव्यांग प्रकार-ब) | दिव्यांग जेष्ठतेनुसार काल्पनिक पदोन्नतीस पात्र | नायब तहसिलदार (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया, जि.गोंदिया या रिक्त पदावर |
| २ | स.म.अ. मुळ ज्येष्ठता सूची २०२४ ज्ये.क्र.४०० | श्री.गजानन नागवे (दिव्यांग प्रकार-ड व ई) | दिव्यांग जेष्ठतेनुसार काल्पनिक पदोन्नतीस पात्र | नायब तहसिलदार (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर, जि.नागपूर या रिक्त पदावर |

२. उक्त अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नती कोट्यातील पदांवर नियमित पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) नायब तहसिलदार संवर्गातील पदोन्नतीच्या अनुषंगाने महसूल विभागाने उपलब्ध करून दिलेली माहिती व कागदपत्रांच्या आधारे सदर निवडसूचीस मान्यता देण्यात येत आहे.

२) सहायक महसूल अधिकारी (अव्वल कारकून) व मंडळ अधिकारी संवर्गातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना दि.३०.०६.२०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीने विचारात घेतलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या एकत्रित ज्येष्ठतासूचीस कोणत्याही न्यायालयात स्थगिती देण्यात आलेली नाही या अटीच्या अधिन राहून वरील निवडसूचीस मान्यता देण्यात येत आहे.

३) निवडसूची तयार करताना कोणीही ज्येष्ठ कर्मचारी अनावधानाने वगळण्यात आलेले नाही अथवा अधिक्रमीत झालेले नाही.

४) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून, त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर सहमती देण्यात येत आहे.

५) सदर निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची दक्षता विभागीय आयुक्त, नागपूर यांनी घ्यावी.

६) नायब तहसिलदार या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असलेल्या वरील अधिकारी पदस्थापनेनंतर प्रत्यक्ष रूजू झाल्याखेरीज पदोन्नतीच्या संवर्गाच्या वेतनाचा लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

७) वरील अधिकाऱ्यांनी पदोन्नतीनंतर नायब तहसिलदार संवर्गात देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या पदावर ३० दिवसांच्या आत रूजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता गमावली जाईल तसेच त्यांची पदोन्नती रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

८) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरती पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क असणार नाही.

९) सदर तात्पुरत्या पदोन्नतीच्या अनुषंगाने पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिकाऱ्यांची शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये.

१०) तसेच भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपुर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग या कार्यालयाची राहील.

३. श्री.प्रकाश इंदूरकर (स.म.अ.मूळ जेष्ठतासूची २०२४, जे. क्र २३३) हे सन २०२३-२४ या निवडसुची वर्षातून दिव्यांग प्रकार गट-अ मधून पदोन्नतीस पात्र ठरले आहेत. परंतू श्री.इंदुरकर हे दिनांक ३१.१२.२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. सबब, श्री.इंदूरकर यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.२९.०७.२०२४ नूसार पूर्वलक्षी प्रभावाने सन २०२३-२४ या निवडसुचिचा २९.०१.२०२४ हा पदोन्नतीचा काल्पनिक मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे. तसेच श्री.राजेश भोंगाडे व श्री.गजानन नागवे यांना देखील दि.२९.०१.२०२४ हा काल्पनिक पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात येत असून श्री.प्रकाश इंदुरकर, श्री.राजेश भोंगाडे व श्री. गजानन नागवे यांची नायब तहसिलदार संवर्गातील ज्येष्ठता उक्त मानीव दिनांकानूसार निश्चित करण्यात यावी. त्यानुषंगाने वर्षनिहाय निवडसूची व नायब तहसिलदार संवर्गाची ज्येष्ठता यादी अद्ययावत करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, नागपूर यांनी तात्काळ करावी.

४. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून, उपरोक्त अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाने कार्यमुक्त करावे व सदर अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू करून घ्यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाने शासनास सादर करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१२९१२४८३९६७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKANT MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=5B514D2C3257BBA976C5A2DE42BE8A635BBA691C05D1F65ED0EAD155A190E90E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2026.01.29 12:49:52 +05'30'

**(श्रीकांत म. मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
६. जिल्हाधिकारी, नागपूर /गोंदिया.
७. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर /गोंदिया.
९. संबंधीत अधिकारी (विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्यामार्फत).
१०. निवडनस्ती, कार्यासन आस्था-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.